**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः29.12.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग अनंतात विलीन ;
- पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आकाशवाणीवरील 'मन की बात' मधून देशवासियांशी संवाद साधणार.
- दक्षिण कोरियामध्ये विमान अपघातात आतापर्यंत 29 जणांचा मृत्यू.

आणि

- मेलबर्न कसोटी क्रिकेटमध्ये भारताचा पहिला डाव 369 धावांवर संपुष्टात ; ऑस्ट्रेलियाकडे 193 धावांची आघाडी.

**मनमोहनसिंग**

माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या पार्थिव देहावर काल दिल्लीतल्या निगम बोध घाटावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. शीख धर्मगुरू आणि डॉक्टर सिंग यांच्या कुटुंबीयांनी अंतिम संस्कारापूर्वी गुरबानीचं पठण केलं. तत्पूर्वी काल सकाळी दिल्लीतल्या कॉंग्रेस पक्षाच्या मुख्यालयात त्यांच पार्थिव शरीर अंत्य दर्शनासाठी ठेवण्यात आल होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, अमित शहा, कॉंग्रेस पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्यासह अनेक मान्यवरांनी माजी पंतप्रधानांना अंतिम श्रद्धांजली वाहिली.

**स्मारक**

डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या स्मारकासाठी जागा देण्यात येणार असल्याची माहीती गृहमंत्रालयाकडून देण्यात आली आहे. या स्मारकासाठी एका विश्वस्त मंडळाची स्थापना करण्यात येणार असून सर्व औपचारिकता पूर्ण केल्या जातील. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर या स्मारकाच्या निर्मितीबाबत कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना कळवण्यात आल्याची माहिती भाजपा प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांनी दिली.

**स्मारक**

डॉक्टर मनमोहन सिंग यांनी पंजाबमधील अमृतसर इथल्या हिंदू महाविद्यालयातून बीए ऑनर्स ची पदवी मिळवली होती. या महाविद्यालयाचे प्राचार्य संजय खन्ना यांनी महाविद्यालयाच्या आवारात डॉक्टर मनमोहन सिंग यांचं स्मारक उभारण्यात येईल असं सांगितलं.

**मनमोहनसिंग**

गरिबीतून सुरुवात करुन बुद्धीमत्तेच्या जोरावर पंतप्रधान होऊन देशाला आर्थिक दिशा आणि आर्थिक शिस्त लावण्याचं काम डॉक्टर मनमोहन सिंग यांनी केलं.  असं महान व्यक्तिमत्व आपल्यात नाही याचे दुःख असून देशासाठी त्यांनी केलेले समर्पण देश कधीही विसरणार नाही असं मत कॉंग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केलं. प्रदेश कॉंग्रेसच्या मुख्यालयात डॉक्टर मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली त्यावेळी ते बोलत होते.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमातून देश-परदेशातील भारतियांशी संवाद साधणार आहेत. या मासिक कार्यक्रमाचा हा 117 वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल.

**महाकुंभ आमंत्रण**

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काल राष्ट्रीय नवी दिल्ली इथं प्रमुख नेत्यांची भेट घेऊन त्यांना महाकुंभ मेळा 2025 साठी आमंत्रित केलं आहे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि मिझोरामचे राज्यपाल जनरल व्ही के सिंह यांची योगी आदित्यनाथ यांनी भेट घेतली. हा महाकुंभमेळा 13 जानेवारी ते 26 फेब्रुवारी दरम्यान उत्तर प्रदेशातील प्रयागराज इथं होणार आहे.

**दिल्ली**

नवी दिल्लीत नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी वाहतुक नियमावली प्रसिद्ध केली आहे. 31 डिसेंबर रोजी रात्री 8 वाजल्यापासून कॅनॉट प्लेसच्या परिसरात नवीन वर्षाचा उत्सव संपेपर्यंत ही नियमावली  लागू केली आहे. या अंतर्गत लावण्यात आलेले निर्बंध सर्व खाजगी आणि सार्वजनिक वाहतूक वाहनांना लागू असणार आहेत. मंडी हाऊस, बंगाली मार्केट, मिंटो रोड-दीनदयाल उपाध्याय मार्ग क्रॉसिंग, जीपीओ, नवी दिल्ली, पटेल चौक आणि जयसिंग रोड-बांगला साहिब लेन चौक आदि भागात हे निर्बंध लागू राहणार आहेत.

**इस्रो-स्पॅडेक्स**

भारतीय अंतराळ संस्था अर्थात इस्रो उद्या प्रथमच स्पेस डॉकिंग एक्सपरिमेंट म्हणजेच दोन यानं अंतराळात परस्परांशी जोडण्याच्या प्रयोग सुरू  करणार आहे. अंतराळ विभागाचे राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंग यांनी एका मुलाखतीत ही माहिती दिली. या मोहिमेमुळे अंतराळात दोन यानं परस्परांशी जोडण्याचं तंत्रज्ञान अवगत असलेल्या मोजक्या देशांच्या यादीत भारताचा समावेश होणार असल्यानं इस्रोची ही मोहिम ऐतिहासिक असेल, असं ते म्हणाले.

**कोळसा**

2023-24 वर्षात देशात आतापर्यंतचे सर्वाधिक कोळसा उत्पादन झालं आहे. 2022-23 च्या तुलनेत 997 दशलक्ष टन कोळशाचे उत्पादन झालं असल्याचं कोळसा मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटलं आहे. 15 डिसेंबरपर्यंत 963 मेट्रिक टन कोळशाचा पुरवठा करण्यात आला असून 'आत्मनिर्भर भारत' अंतर्गत परिवर्तनात्मक उपायांसह, देशांतर्गत कच्च्या कोकिंग कोळशाचे उत्पादन पुढील पाच वर्षांत 140 मेट्रिक टनापर्यंत पोहोचण्याची शक्यता असल्याचं मंत्रालयाने म्हटले आहे.

**महामार्ग**

श्रीनगर जम्मू राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 44 हा विविध भागांवर बर्फ साचल्यामुळे बंद करण्यात आला आहे. महामार्गावरील वाहतूक दोन्ही दिशांनी बंद करण्यात आली आहे. काझीगुंड विभाग, रामबन, उधमपूर आणि जम्मूमध्ये तेराशेहून अधिक अवजड वाहने अडकून पडल्याची माहिती आहे.

**वेरूळ चित्रपट महोत्सव**

दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची काल घोषणा करण्यात आली. येत्या 15 ते 19 जानेवारी 2025 या दरम्यान महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर इथं हा महोत्सव होणार आहे. या महोत्सवात भारतीय सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल दिला जाणारा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शिका सई परांजपे यांना जाहीर करण्यात आला आहे.

**बांगलादेश नेते**

बांगलादेशातील अशांत परिस्थितीच्या पार्श्र्वभूमीवर तिथं लवकरात लवकर शांतता आणि सलोखा प्रस्थापित होण्याची आणि तेथील महिलांसह अल्पसंख्य हिंदुंवर  होणारे अत्याचार थांबण्याची गरज पश्चिम बंगालमधील हिंदू आणि मुस्लिम समाजाच्या नेत्यांनी काल व्यक्त केली. कोलकाता इथं काल आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला हिंदू सनातनी संगठन आणि अखिल भारतीय इमाम संघटनेचे प्रमुख नेते उपस्थित होते. या सर्वांनी बांगलादेशातल्या परिस्थितीबाबत चिंता व्यक्त करत तेथील अल्पसंख्याकांवर आणि त्यांच्या प्रार्थनास्थळांवर वारंवार होत असलेल्या हल्ल्यांसंदर्भात चर्चा केली.

तेथील हंगामी सरकारनं अल्पसंख्याकांच्या जीवितांचं आणि मालमत्तांचं रक्षण करण्यासाठी पावलं उचलण्याची गरज त्यांनी एकमुखानं व्यक्त केली

**मतदानवय**

बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीने म्हटलं आहे की मुख्य सल्लागार मुहम्मद युनूस यांनी मतदानाचे किमान वय 17 केल्यास निवडणूक आयोगावर दबाव येईल आणि निवडणूक प्रक्रियेस विलंब होऊ शकेल. माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या हकालपट्टीनंतर अंतरिम सरकारचे नेतृत्व करणारे मुहम्मद युनूस यांनी मतदारांचे किमान वय 17 वर्षे कमी करावे, असे सुचवले आहे. तर पक्षाचे सरचिटणीस मिर्झा फखरुल इस्लाम आलमगीर यांनी ढाका येथील जातिया प्रेसक्लबमध्ये झालेल्या चर्चेदरम्यान सांगितले की, मतदानाचे वय 17 पर्यंत कमी केल्यास नवीन मतदार यादी तयार करावी लागेल. तसेच अंतरिम सरकार जाणीवपूर्वक निवडणूक प्रक्रिया लांबवण्याचा प्रयत्न करत असल्याचा लोकांमध्ये समज असून युनूस यांनी संबंधित घटकांशी चर्चा केल्याशिवाय हा मुद्दा उपस्थित करणे योग्य नसल्याचे आलमगीर यांनी म्हटलं आहे.

**कार्लसन**

जागतिक बुद्धिबळातील क्रमांक एकचा बुद्धिबळपटू मॅग्नस कार्लसन याला ड्रेसकोडचे  उल्लंघन केल्याप्रकरणी दंड आणि अपात्र ठरवण्यात आले आहे.त्यामुळे कार्लसन याला FIDE वर्ल्ड रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेतून बाहेर पडावं लागलं आहे. या निर्णयावर आपण दाद मागणार नसल्याचं कार्लसन याने म्हटलं आहे. दरम्यान फिडेचे उपाध्यक्ष आणि पाच वेळा जगजेत्ता राहिलेले विश्वनाथन आनंद यांनी सांगितले की कार्लसनने स्पर्धेच्या ड्रेस कोडच्या नियमांचे पालन करण्यास नकार दिल्यानंतर FIDE कडे पर्याय राहिला नव्हता.

**विमान अपघात**

दक्षिण कोरियामध्ये आज एका विमानाचं भीषण अपघात झाला असून या अपघातात आतापर्यंत 29 जणांचा मृत्यू झाला आहे. मुआन आंतरराष्ट्रीय विमानतळावर हे विमान उतरत असताना हा अपघात झाला. विमानात एकंदर 175 प्रवासी होते. अपघाताचे नेमके कारण स्पष्ट झाले नसून पक्ष्यांच्या धडकेमुळे लँडिंग गियर खराब झाले असल्याने विमानात तांत्रिक बिघाड झाला असल्याची प्राथमिक माहिती आहे. धावपट्टीवर विमान उतरल्यानंतर ते भिंतीला धडकल्याने त्याचा स्फोट झाला. जेजू विमान कंपनीचे हे विमान बँकॉकहून परत येत होते.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान मेलबर्न इथं सुरू असलेल्या कसोटी क्रिकेटच्या चौथ्या सामन्यात चौथ्या दिवशी भारताचा पहिला डाव 369 धावांवर संपुष्टात आला. अष्टपैलू नितीश रेड्डीने सर्वाधिक 114 तर वॉशिंग्टन सुंदरने 50 धावा केल्या.ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावात शेवटचं वृत्त हाती आलं तेंव्हा 5 बाद 88 धावा झाल्या आहेत. पहिल्या डावातील 105 धावांच्या आघाडीसह यजमानाकडे एकंदर 193 धावांची आघाडी झाली आहे.

.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं , नमस्कार.**